

|| इतिहास प्रबोधिनी ||

|| डॉ सूर्यकांत कापशीकर ||

# द्वारा प्रस्तुत



युपी.एस.सी., एम.पी.एस.सी.,
एस.एस.सी., रेल्वे, बँकिंग आणि पोलीस
या सारख्या विविध स्पर्धा परीक्षा तसेच
सर्व विद्यापीठांच्या आधुनिक भारताचा इतिहास
या विषयाच्या परीक्षाकरिता उपयुक्त असे
व्हिडीओ लेक्चर

## प्रस्तुतकर्ता


# डॉ सूर्यकांत कापशीकर

इतिहास विभाग प्रमुख

यशोदा गर्ल्स आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज

स्नेह नगर नागपूर

# माउंटबॅटन योजना



# माउंटबॅटन योजना

## प्रस्तावना

माउंटबॅटन योजना ही आधुनिक भारताच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण योजना आहे. इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य देण्याचे निश्चित केल्यानंतर ही योजना तयार करण्यात आली. भारताचे शेवटचे व्हाईसरॉय लॉर्ड माउंटबॅटन यांनी ही योजना तयार केली असल्यामुळे या योजनेला माउंटबॅटन योजना असे म्हटल्या जाते. या योजनेद्वारे भारताची फाळणी झाल्याने या योजनेला फाळणीची योजना असेही म्हटल्या जाते. या योजनेमुळे हिंदू-मुसलमान यांचे विभाजन झाल्यामुळे तिला मनबाटन योजना सुद्धा म्हटल्या जाते.

# माउंटबॅटन योजना

## लॉर्ड माउंटबॅटनचे प्रारंभिक जीवन

लॉर्ड माउंटबॅटन यांचा दिनांक २५ जून १९०० रोजी जन्म ब्रिटीश राजपरिवारात झाला. भारताचे व्हाईसरॉय बनण्यापूर्वी ते ब्रिटीश नौदलाम
ध्ये कार्यरत होते. दुसऱ्या महायुद्धात त्यांनी दक्षिण पूर्व आशियात दोस्त राष्ट्राच्य

# माउंटबॅटन योजना

## व्हाईसरॉय पदाची प्राप्ती

लॉर्ड माउंटबॅटन हे भारताचे १९ वे आणि शेवटचे व्हाईसरॉय होते. दिनांक
२१
फे
ब्ुवारी १९४७ रोजी लॉर्ड वेव्हेल यांच्या जागी त्यांची व्हाईसरॉय म्हणून नियुक्ती क

# माउंटबॅटन योजना

## माउँटबॅटन योजनेमागील कारणे

- आंतरराष्ट्रीय दबाव
- क्लेमेंट अँटली यांची घोषणा
- कॅबिनेट मिशनचे अपयश
- त्रीमंत्री योजनेचे अपयश
- वेव्हेल योजनेचे अपयश
- भारतातील स्फोटक परिस्थिती
- काँग्रेसची भूमिका
- मुस्लीम लीगची भूमिका
- लॉर्ड माउंटबॅटन यांची भूमिका

# माउंटबॅटन योजना

## माउंटबॅटन योजनेतील तरतुदी

- दिनांक १५ ऑगस्ट १९४७ रोजी सत्तांतर करण्यात येईल.
- दिनांक १५ ऑगस्ट १९४७ नंतर ब्रिटीशांचे वर्चस्व राहणार नाही.
- भारताची फाळणी करण्यात येईल.
- फाळणीनंतर भारत-पाकिस्तान असे दोन सरकार बनतील.
- संरक्षण, दळणवळण, कर्ज आणि चलन यांची विभागणी केल्या जाईल.
- सीमा निर्धारण आयोग स्थापन करण्यात येईल.
- भारतीय संस्थानांना निर्णय स्वातंत्र्य राहील.
- घटना समितीचे कामकाज सुरु राहील.
- घटना मान्य नसणाऱ्यांना वेगळी घटना बनविण्याचे स्वातंत्र्य राहील.
- ब्रिटीश कुलात सहभागी होण्याचे निर्णय स्वातंत्र्य राहील.

# माउंटबॅटन योजना

## माउंटबॅटन योजनेतील तरतुदी

- फाळणीसाठी बंगाल, पंजाब आणि आसामचे विभाजन करण्यात येईल.
- पंजाबचे कायदेमंडळ फाळणीबाबत निर्णय घेतील.
- बंगालचे कायदेमंडळ फाळणीबाबत निर्णय घेतील.
- सिंध प्रांताने विधानसभेत बहुमताने निर्णय घेण्यात येईल.
- वायव्य सरहद्द प्रांताला सार्वमताचे स्वातंत्र्य देण्यात येईल.
- बलुचिस्तानला सार्वमताचे स्वातंत्र्य देण्यात येईल.
- आसाममधील सिल्हेट जिल्ह्याला सार्वमताचे स्वातंत्र्य देण्यात येईल.
- भारतीय संस्थानिकांना निर्णय स्वातंत्र्य देण्यात येईल.

# माउंटबॅटन योजना

## माउंटबॅटन योजनेचे गुण

- भारताला स्वातंत्र्य मिळाले.
- ब्रिटीशांची गुलामगिरी नष्ट झाली.
- घटना समिती कार्य सुरु राहिले.
- हंगामी सरकारची स्थापना करण्यात आली.

# माउंटबॅटन योजना

## माउंटबॅटन योजनेचे दोष

- भारताची फाळणी झाली.
- पाकिस्तानची निर्मिती झाली.
- अखंड भारताचे स्वप्न भंग झाले.
- ब्रिटीशांचे फोडा आणि राज्य करा स्वप्न पूर्ण झाले.
- हिंदू-मुस्लीम मतभेद वाढला.
- प्रचंड प्रमाणात प्राणहानी झाली.
- अमर्याद वित्तहानी झाली.

# माउंटबॅटन योजना

## माउंटबॅटन योजनेस मान्यता

- महात्मा गांधीजी.
- भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस.
- मुस्लीम लीग.
- डॉ बाबासाहेब आंबेडकर.

# माउंटबॅटन योजना

## माउंटबॅटन योजनेस अमान्यता

- हिंदू महासभा.
- समाजवादी पक्ष.
- शीख समुदाय.
- खान अब्दुल गफार खान.
- स्वातंत्र्यवीर सावरकर.

# माउंटबॅटन योजना

## माउंटबॅटन योजनेचे मूल्यमापन

माउंटबॅटन योजना भारताच्या इतिहासाला नवीन वळण देणारी योजना ठरली. या योजनेमुळे भारत स्वतंत्र होऊन एक नवीन पर्व सुरू झाले मात्र भारताची फाळणी झाल्यामुळे अखंड भारताचे स्वप्न भंग पावले. भारत आणि पाकिस्तान हे दोन देश एकमेकांचे कायमचे शत्रू बनले. ब्रिटीशांची फोडा आणि राज्य करा ही नीती सफल झाली. माउंटबॅट

# माउंटबॅटन योजना

## भारतीय स्वातंत्र्याचा कायदा

दिनांक १९ जुलै १९४७ रोजी ब्रिटीश संसदेने माउंटबॅटन योजनेनुसार भारतीय स्वातंत्र्याचे विधेयक पारित केले. त्यावर इं
ग्लंडचा सम्राट सहावा जॉर्ज याची सही झाल्यानंतर त्याचे कायद्यात रुपांतर

# माउंटबॅटन योजना

## भारतीय स्वातंत्र्याचा कायद्यातील तरतुदी

- भारत आणि पाकिस्तान सार्वभौम राष्ट्र बनतील.
- इंग्लंडचा सम्राट भारताचा सम्राट राहणार नाही.
- भारतमंत्री पद नष्ट करण्यात येईल.
- ब्रिटिशांनी केलेले सर्व तह करार रद्द करण्यात येईल.
- ब्रिटीश संसदेचे भारतासाबंधी कायदेविषयक अधिकार संपुष्टात येतील.
- घटना तयार होईपर्यंत १९३५ च्या कायद्याप्रमाणे राज्यकारभार करण्यात येईल.

# धन्यवाद !


## डॉ सूर्यकांत कापशीकर

इतिहास विभाग प्रमुख

यशोदा गर्ल्स आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज

स्नेह नगर नागपूर

मोबाईल क्रमांक: 9689281857

इमेल: suryakantmkapshikar@gmail.com